# नोव्हेंबरमध्ये मेट्रो ३ ची ट्रायल रन



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ दरम्यान प्रस्तावित मेट्रो ३ चे काम युद्धपातळीवर सुरू असून, पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वाच्या दिशेने आहे. मेट्रो प्रशासनाने आरे ते बीकेसी अशी पहिल्या टप्प्यातील वाहतूक सुरू करण्यासाठी ट्रायल रन घेण्यात येणार आहे. नोव्हेंबरमध्ये चाचणी होणार आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिका ३३.५ किमी लांबीची असून, दोन टप्प्यात या मार्गिकेचे काम करण्यात येत आहे. आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होत आले आहे. ही मार्गिका डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल होणार असल्याने एमएमआरसीने त्याची ट्रायल रन घेण्याचा निर्णय घेतला आहे. चाचण्या पूर्ण करून मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्याकडून सुरक्षा प्रमाणपत्र घेतले जाईल व त्यानंतर मेट्रो सुरू केली जाईल यासाठी वेळ लागणार असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.